पुढारी शहर-जिल्हा सिंधुदुर्ग, बुधवार, ६ जुलै २०२२

दोडामार्ग येथे ५८ जणांची रक्तगट, हिमोग्लोबीन तपासणी

दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा

सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठान दोडामार्ग, लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या विद्यमाने दोडामार्ग तालुका वर्धापन दिनाचे औचित्य साधून येथील हळबे महाविद्यालयात रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबीराचे आयोजन केले होते. या शिबिरात ५८ जणांची तपासणी करण्यात आली. पैकी २ निगेटिव्ह रक्तगट सापडले, तर १४ जणांत हिमोग्लोबिनची कमतरता जाणवली.

मान्यवरांच्या हस्ते शिबिराची सुरूवात करण्यात आली. व्यासपीठावर तहसीलदार अरुण खानोलकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. ज्ञानेश्वर ऐवळे, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सिंधुरक्तमित्र प्रतिष्ठानचे सावंतवाडी-दोडामार्ग विभागीय अध्यक्ष संजय पिळणकर, दोडामार्ग अध्यक्ष विवेकानंद नाईक, उपाध्यक्ष श्री. तुळसकर व गीतांजली सातार्डेकर, सचिव संतोष सातार्डेकर, प्रा. दिलिप बर्वे, प्रा. श्री. इंगळे, अजित सावंत, आरोग्य सेविका श्रुती शिरोडकर, रेश्मा क्षीरसागर, रजनी बुटे, आरोग्य परिवेक्षक सदाशिव आयनोडकर, प्रतिष्ठान सहसचिव वैभव रेडकर, रामकृष्ण दळवी उपस्थित होते.

दोडामार्ग : रक्तदान शिबिरावेळी उपस्थित सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठान तालुकाध्यक्ष विवेकानंद नाईक. सोबत अन्य.